माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक :- २२४८/२०१९**

**अपिलार्थी :- श्री.देविसींग रामलाल ब्राम्हणे,**
**मु.पो.चांडोळ, ता.जि.बुलडाणा-४४३१०६, मो.न. ९९६०८५०५७७.**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत कार्यालय, धोत्रा भणगोजी, ता.चिखली, जि.बुलडाणा.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),**
**पंचायत समिती, चिखली, ता.चिखली, जि.बुलडाणा.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०९.२०२५**

**अपिलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| **०३.०५.२०१९** | २०.०७.२०१९ | **१८.०६.२०१९** | १५.०७.२०१९ |

१. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **दिनांक १९.०८.२०१९** रोजी **जोडपत्र-क** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दाखल केला. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये "*आदेश पारित झाले पण आजपर्यंत माहिती मिळाली नाही*", असे नमूद केले आहे.

२. सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री.यु.एस.डुकरे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, शेलुद श्रीमती नैना जाधव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.एन.जे.उगले उपस्थित आहेत.

३. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार अपिलार्थी यांनी **दिनांक ०३.०५.२०१९** रोजी **जोडपत्र-अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये "** सन २०१७ ते २०१९ या आर्थिक वर्षाचे दि.३/५/२०१७ पासून दि.३/५/२०१९ पर्यंत शासनाकडून धोत्र भनगोजी ग्रा.पं. कार्यालयास दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे करण्याकरिता शासनाकडून प्राप्त झालेला निधी व सदर मिळालेल्या निधीतून दि.३/५/२०१९ पर्यंत खर्च करण्यात आलेला निधी व त्या खर्च करण्यात आलेल्या निधीमधून शिल्लक / जमा असल्याबाबत तपशिलवार माहिती देण्यात यावी. * सदर मिळालेल्या निधीतून दि.३१/३/२०१८ ते दि.०१/४/२०१९ पर्यंत ग्रा.पं. कार्यालयाने जी विविध विकास कामे केलेली आहे व त्या विविध विकास कामावर जो खर्च करण्यात आलेला आहे,*

*त्या सर्व तपशिलवार कामाची नावासह विवरणामध्ये प्रत्येक केलेल्या कामाचे नावासह व त्यावर झालेल्या खर्चासह माहिती देण्यात यावी. * धोत्रा भनगोजी ग्रा.पं. कार्यालयाने दि.३/५/२०१७ ते दि.३/५/२०१९ या कालावधीपर्यंत गावातील करण्यात आलेल्या विविध विकास कामाकरिता गौण खनिजाचा वापर करण्यात आला आहे का, असल्यास गौण खनिजाची वर्गवारी नुसार माहिती देण्यात यावी. तसेच वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची शासनाकडून रॉयल्टी भरण्यात आलेली असल्यास ब्रासची तपशिलवार व रॉयल्टीची झेरॉक्स प्रत तसेच वरील मागितलेली माहिती ही अर्जदारास न चूकता पुरविण्यात यावी.*" इ. माहिती मागितली होती.

४. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नुसार दाखल झालेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात निकाली काढणे बंधनकारक आहे.

५. मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक १८.०६.२०१९** रोजी कलम १९ (१) नुसार **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये "माहिती पुरविली नाही" असे नमूद केले आहे.

६. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०७.२०१९ रोजी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन, "*अपिलार्थी यांनी मागीतलेली उपलब्ध माहिती आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी*" असे आदेश पारित केले. या सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित होते तर जन माहिती अधिकारी रजेवर असल्याने उपस्थित नव्हते.

७. व्दितीय अपिलाच्या सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगीतले की, दि.२०.०७.२०१९ रोजी अपिलार्थीस माहिती दिली, परंतू याबाबत पुरावा व पत्र जोडलेले नाही. माहिती मिळाली असतांनाही अपिलार्थीने दि.१९.०८.२०१९ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर व सुनावणीच्या वेळीचा युक्तिवाद विचारात घेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**अंतरिम आदेश**

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, चिखली श्री.एन.जे.उगले यांना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी दि.२६.०९.२०२५ रोजीच्या पत्राचे आवक रजिस्टर पुढील सुनावणीस आयोगासमक्ष सादर करावे.

२. पुढील सुनावणी दिनांक रोजी, सकाळी/दुपारी वाजता ठेवण्यात आली आहे.

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, अमरावती.**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०९.२०२५**

जावक क्रमांक ५८८८ दिनांक 25 SEP 2025

MJG